दैनिक
बीड महाराष्ट्र | मंगळवार , 1 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 113 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

## परळी वैजनाथ नगरीत राष्ट्रसंत भगवानबाबा जयंतीचा


# भव्य सोहळा शहर भगवामय, शोभायात्रेची जय्यत तयारी पूर्ण!

### भगवानबाबा चौकाचे अनावरण, पूजन-अभिषेक, हरिपाठासह भव्य रथातून शोभायात्रेचे आयोजन

### सर्व जाती-धर्मातील नागरिकांनी सहभागी होण्याचे उत्सव समितीचे आवाहन

■ परळी वैजनाथ (नितीन ढाकणे) :

॥ बैसोनी पाण्यावरी वाचविली ज्ञानेश्वरी ॥ या उक्तीला सार्थ ठरवणारे ऐश्वर्यसंपन्न राष्ट्रसंत श्री भगवानबाबा यांचा सार्वजनिक जयंती महोत्सव यंदा परळी वैजनाथ नगरीत मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. ऐश्वर्यसंपन्न राष्ट्रसंत श्री भगवानबाबा जयंती उत्सव समिती, परळी वैजनाथ यांच्या वतीने या जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात जय्यत तयारी सुरू आहे. ठिकठिकाणी भगवे ध्वज आणि सजावट करण्यात आल्याने परळी नगरी भगवामय झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



#### भव्य चौकाचे होणार अनावरण

■ जयंती महोत्सवाच्या पूर्वसंध्येला ३१ ऑगस्ट २०२६ रोजी श्री संत भगवानबाबा चौक येथे भव्य चौकाचे अनावरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी शहरातील मान्यवर, भाविक भक्त आणि भगवानबाबांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

#### जयंतीदिनी विविध धार्मिक कार्यक्रम

■ १ सप्टेंबर २०२६ रोजी मुख्य जयंती उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा होणार आहे. सकाळी श्रींच्या प्रतिमेचे पूजन व अभिषेक करण्यात येईल. त्यानंतर हरिपाठ आणि गुलालाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दुपारी १२.३० वाजता श्री भगवानबाबांच्या प्रतिमेची भव्य रथातून शोभायात्रा काढण्यात येणार आहे. शोभायात्रेत मोठ्या संख्येने भाविक सहभागी होणार असून, विविध धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांनी जयंती सोहळ्याची रंगत वाढणार आहे.

#### असा असेल शोभायात्रेचा मार्ग

■ भव्य शोभायात्रेला भगवानबाबा चौक येथून सुरुवात होऊन ती शिवाजी महाराज चौक, महर्षी वाल्मिकी चौक, हनुमान मंदिर मोंढा, राणी लक्ष्मीबाई चौक मार्गे पुढे जाईल. त्यानंतर जगमित्र नागा महाराज मंदिर येथे शोभायात्रेचा समारोप करण्यात येणार आहे. सर्व समाजबांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन राष्ट्रसंत भगवानबाबांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यास वंजारी समाज बांधवांसह सर्व जाती-धर्मातील नागरिक आणि भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जयंती उत्सव समिती, परळी वैजनाथ यांच्या वतीने करण्यात आले आहे. जयंती उत्सवासाठी समितीच्या वतीने मागील अनेक दिवसांपासून नियोजन आणि तयारी करण्यात येत असून, शहरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. राष्ट्रसंत भगवानबाबांच्या विचारांचा आणि कार्याचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवत हा जयंती महोत्सव उत्साहात साजरा करण्याचा संकल्प समितीने केला आहे.

## मनोज जरांगे पाटलांचे उपोषण सोडवण्यासाठी

# शासनाने तातडीने संवाद साधावा

### खा. बजरंग सोनवणे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

■ बीड प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या संवेदनशील व न्याय्य मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणास बसलेले संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या बिघडणाऱ्या प्रकृतीची शासनाने तातडीने दखल घ्यावी, तसेच त्यांच्याशी सकारात्मक संवाद साधून हे उपोषण सोडवण्यासाठी ठोस निर्णय घ्यावा, असे पत्र बीड लोकसभेचे खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवले आहे.



याबाबत खा.बजरंग सोनवणे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ३१ ऑगस्ट २०२६ रोजी पाठवलेल्या पत्रात मराठा समाजाच्या वेदना आणि सध्याच्या परिस्थितीचे गांभीर्य स्पष्टपणे मांडले आहे. पत्रात नमूद करण्यात आले आहे की, मनोज जरांगे पाटील हे २९ ऑगस्ट २०२६ पासून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पुन्हा एकदा उपोषणास बसले आहेत. समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांना वारंवार आंदोलनाचा व उपोषणाचा खडतर मार्ग स्वीकारावा लागत आहे. ही बाब अत्यंत चिंताजनक असून सततच्या उपोषणामुळे आता त्यांच्या आरोग्यावर आणि प्रकृतीवर गंभीर विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वैद्यकीय व प्रशासकीयदृष्ट्या त्यांच्या प्रकृतीकडे प्राधान्याने लक्ष देणे गरजेचे आहे. पुढे पत्रात म्हटले आहे की, हा मुद्दा केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नसून, संपूर्ण महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या तीव्र भावना या आंदोलनाशी जोडलेल्या आहेत. समाजातील अस्वस्थता दिवसेंदिवस वाढत आहे. ही परिस्थिती लक्षात घेता राज्य शासनाने आरक्षणाच्या या प्रश्नाकडे केवळ प्रशासकीय दृष्टिकोनातून न पाहता पूर्ण गांभीर्याने आणि संवेदनशीलतेने पाहावे. मुख्यमंत्र्यांनी स्वतः पुढाकार घेऊन मनोज जरांगे पाटील यांच्याशी तातडीने थेट संवाद साधावा. शासनाने आपली भूमिका स्पष्ट करून मराठा समाजाच्या मागण्यांवर सकारात्मक व कायदेशीर तोडगा काढावा आणि उपोषण त्वरित सोडवण्यासाठी आवश्यक ती सर्व प्रशासकीय कार्यवाही करावी, असेही खा.बजरंग सोनवणे यांनी या पत्राद्वारे केली आहे.

## सप्टेंबरच्या सुरुवातीलाच हवामान बदलणार

मुंबई : महाराष्ट्रात ऑगस्ट महिन्यात पावसाने काहीशी ओढ दिल्यानंतर सप्टेंबरच्या सुरुवातीला हवामानात बदल होण्याची शक्यता आहे. आज, १ सप्टेंबरला राज्यातील बहुतांश भागांसाठी मोठ्या पावसाचा इशारा नाही, मात्र पुढील काही दिवसांत विशेषतः विदर्भात पावसाचा जोर वाढण्याचे संकेत भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.

**कोकणात उघडीप कायम**

ऑगस्टच्या अखेरीस कोकणात पावसाने काहीशी विश्रांती घेतली आहे. आज पालघर, ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी परिसरात काही ठिकाणी हलक्या सरींची शक्यता आहे. मात्र, सध्या जोरदार पावसाचा इशारा नाही. दमट आणि उष्ण वातावरण कायम राहण्याची शक्यता असल्याने कोकणात चांगल्या पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

**उत्तर महाराष्ट्रात हलक्या सरींची शक्यता**

उत्तर महाराष्ट्रातील काही भागांतही हलक्या पावसाची शक्यता आहे. पुढील २४ तासांत जोरदार पावसाची चिन्हे नसली तरी जळगावसह काही भागांत हलक्या ते मध्यम सरी पडू शकतात.

**पश्चिम महाराष्ट्रातही पावसाची शक्यता :**

पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यांत काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाच्या सरींची शक्यता आहे. या भागांसाठी सध्या मोठा पावसाचा अलर्ट नाही. ढगाळ वातावरणासह अधूनमधून पावसाच्या सरी पडू शकतात. IMDच्या प्रादेशिक अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रात पुढील काही दिवसांत मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटाची शक्यता आहे.

**मराठवाड्यात काही दिवसांनी पावसाचा जोर वाढणार?**

छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड आणि लातूर या भागांत आज मोठ्या पावसाचा इशारा नाही. मात्र, काही ठिकाणी हलका ते मध्यम आणि वादळी पाऊस होऊ शकतो. IMDच्या ताज्या अंदाजानुसार मराठवाड्यात ४ सप्टेंबरला मेघगर्जना आणि विजांसह वादळी हवामानाची शक्यता आहे.

**विदर्भात २ सप्टेंबरपासून जोरदार पाऊस :**

सप्टेंबरच्या सुरुवातीला सर्वाधिक लक्ष विदर्भाकडे लागले आहे. २ सप्टेंबरला विदर्भासाठी मुसळधार पावसासह मेघगर्जना आणि विजांचा इशारा देण्यात आला आहे. त्यानंतर ३ सप्टेंबरलाही विदर्भात काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता कायम आहे. IMDच्या ताज्या राष्ट्रीय हवामान बुलेटिननुसार, १ ते ३ सप्टेंबरदरम्यान विदर्भात व्यापक स्वरूपात पाऊस होण्याची शक्यता असून २ ते ३ सप्टेंबरला काही ठिकाणी मुसळधार पाऊस आणि मेघगर्जनेसह वादळी स्थिती निर्माण होऊ शकते.

## अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या नूतन राज्य अध्यक्षपदी शिवराज काटकर यांची निवड

■ सांगली वृत्तसंस्था

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या नूतन राज्य अध्यक्षपदी शिवराज काटकर यांची निवड झाल्याबद्दल राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, छत्रपती संभाजीनगर विभागीय संघटक सुभाष चौरे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके आणि छत्रपती संभाजीनगर विभागीय सचिव रवि उबाळे, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी त्यांचा सत्कार केला. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या नूतन राज्य अध्यक्षपदी शिवराज काटकर यांची सांगली येथे आयोजित राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत निवड करण्यात आली. या कार्यकारिणीच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख होते. यावेळी विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे तसेच मावळते राज्य अध्यक्ष मिलिंद आष्टीकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख यांची उपस्थिती होती.



## संपादकीय


### केशवराव भोसले’ तिऱ्हाईताच्या ताब्यात?

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कलादृष्टीतून उभे राहिलेले आणि कोल्हापूरच्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक असलेले संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह पुनर्बांधणीच्या अंतिम टप्प्यात असतानाच त्याच्या व्यवस्थापनावरून वाद निर्माण झाला आहे. महापालिकेने व्यवस्थापन बाह्य संस्थेकडे सोपविण्याच्या निर्णयामुळे रंगकर्मी, सांस्कृतिक कार्यकर्ते आणि विरोधकांनी सार्वजनिक सांस्कृतिक वारशाच्या जतनाबाबत चिंता व्यक्त केली आहे.

कोल्हापुरात श्रीमंत छत्रपती शाहू महाराजांच्या कलावारशावरून नव्या वादाला तोंड फुटले आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या कलादृष्टीतून साकारलेले आणि कोल्हापूरच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक मानले जाणारे संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह भीषण आगीच्या दुर्घटनेनंतर नव्याने उभे राहत असतानाच त्याच्या व्यवस्थापनावरून संघर्ष निर्माण झाला आहे. नाट्यगृहाच्या पुनर्बांधणीचे काम अंतिम टप्प्यात आले असताना महापालिकेने त्याचे व्यवस्थापन बाह्य संस्थेकडे सोपविण्याचा प्रस्ताव मांडला. २० जुलै रोजी झालेल्या महासभेत हा प्रस्ताव ४३ विरुद्ध २९ मतांनी मंजूर झाला. त्यामुळे ‘जनतेच्या पैशातून नाट्यगृहाची पुनर्बांधणी करायची आणि त्यानंतर त्याचे व्यवस्थापन खासगी किंवा बाह्य संस्थेकडे सोपवायचे का?’ असा सवाल रंगकर्मी, सांस्कृतिक कार्यकर्ते आणि विरोधी पक्षांकडून उपस्थित केला जात आहे. ८ ऑगस्ट २०२४ रोजी लागलेल्या भीषण आगीत केशवराव भोसले नाट्यगृहाचे मोठे नुकसान झाले. या दुर्घटनेनंतर कोल्हापूरकरांच्या भावना तीव्र झाल्या आणि ‘जसे होते तसेच नाट्यगृह पुन्हा उभे करा’, अशी मागणी सर्वपक्षीय पातळीवर जोर धरू लागली. या पार्श्वभूमीवर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घटनास्थळी पाहणी करून वर्षभरात नाट्यगृहाची पुनर्बांधणी पूर्ण करण्याची ग्वाही दिली. तसेच, राज्य शासनाने पुनर्बांधणीसाठी २५ कोटी रुपयांच्या निधीची घोषणा केली.

या पुनर्बांधणीसाठी रंगकर्मींना प्रशासनाचा वारंवार पाठपुरावा करावा लागला. कामाला होत असलेल्या विलंबाच्या निषेधार्थ त्यांनी आंदोलने, निवेदने, फेऱ्या तसेच विविध अभिनव मार्गांनी आंदोलन केले. २०२४ मध्येच रंगकर्मींनी नाट्यगृहाच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे व्यावसायिकीकरण होऊ नये, अशी ठाम भूमिका मांडली होती. आता नाट्यगृहाच्या पुनर्बांधणीचे काम अंतिम टप्प्यात आले असताना, इस्टेट विभागाने त्याच्या व्यवस्थापनासाठी बाह्य व्यवस्थापक नेमण्याचा प्रस्ताव मांडला आहे. प्रशासनाच्या मते, नाट्यगृहाच्या देखभाल खर्च आणि उत्पन्नामध्ये दरवर्षी सुमारे ५० लाख रुपयांची तफावत असून, बाह्य व्यवस्थापनामुळे कार्यक्षम कारभार, नियमित देखभाल आणि आर्थिक शिस्त राखणे शक्य होईल. मात्र, या प्रस्तावामुळे नाट्यगृहाच्या भाड्यात वाढ होणार का, सामान्य रंगकर्मी आणि सांस्कृतिक संस्थांना ते पूर्वीप्रमाणे उपलब्ध राहणार का, सांस्कृतिक कार्यक्रमांना प्राधान्य कायम राहील का, तसेच नाट्यगृहाचे सार्वजनिक स्वरूप अबाधित राहील का, असे अनेक महत्त्वाचे प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत. महासभेतील चर्चेदरम्यान विरोधकांनी याच मुद्द्यावर आक्षेप नोंदवला. नगरसेवक सुनील मोदी यांनी शासनाच्या ६ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या जीआरचा संदर्भ देत संबंधित संस्थेची कायदेशीर नोंदणी, लेखापरीक्षण, पात्रता पडताळणी तसेच सार्वजनिक निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे राबवण्याची मागणी केली. आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड यांनीही हा प्रस्ताव पुढे नेण्यापूर्वी सर्व कायदेशीर बाबींची सखोल तपासणी केली जाईल, असे स्पष्ट केले. दरम्यान, आगीनंतरच्या चौकशीचा आणि जबाबदारी निश्चित करण्याचा प्रश्न अद्यापही पूर्णपणे निकाली निघालेला नाही. सुरुवातीला एफआयआर दाखल न केल्याबद्दल प्रशासनावर टीका झाली होती. अखेर ३० ऑगस्ट २०२४ रोजी अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

म्हणूनच कोल्हापूरच्या सांस्कृतिक क्षेत्राचा प्रश्न हा केवळ व्यवस्थापनापुरता मर्यादित नसून, वारसा कोणाचा आणि त्याचा उपयोग कोणासाठी, हा मूलभूत मुद्दा आहे. छत्रपती शाहू महाराजांनी कलेला राजाश्रय दिलेल्या या ऐतिहासिक वास्तूचे सार्वजनिक सांस्कृतिक केंद्र म्हणून संवर्धन करायचे की केवळ आर्थिक निकषांवर तिचे व्यवस्थापन करायचे, याचा निर्णय आता प्रशासनाला घ्यावा लागणार आहे. बाह्य व्यवस्थापन म्हणजे थेट खासगीकरण नव्हे, असे प्रशासनाने स्पष्ट केले असले तरी रंगकर्मी आणि सांस्कृतिक क्षेत्रातील जाणकारांमध्ये शंका कायम आहे. आज व्यवस्थापन, उद्या व्यावसायिकीकरण आणि पुढे सार्वजनिक मालकीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची भीती ते व्यक्त करीत आहेत. त्यामुळे अंतिम निर्णय घेण्यापूर्वी शासन आदेश, निविदेच्या अटी, भाडेनिश्चितीची पारदर्शक पद्धत, कलाकारांसाठीच्या सवलती आणि नाट्यगृहाचा सार्वजनिक वापर अबाधित राहील, याबाबतचे स्पष्ट धोरण जाहीर करणे हीच प्रशासनाच्या पारदर्शकतेची खरी कसोटी ठरेल. अन्यथा आगीतून सावरलेले हे ऐतिहासिक नाट्यगृह पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडण्यास वेळ लागणार नाही.



# राष्ट्रसंत भगवानबाबांच्या जन्मतिथीचा ‘पसायदान दिन’ म्हणून गौरव करा राज्य सरकारकडे लाखो भाविकांची एकमुखी मागणी : गणेश खाडे

## ज्ञानेश्वरी घराघरात पोहोचवणाऱ्या राष्ट्रसंत भगवानबाबांना अभिवादन विश्वकल्याणाचा संदेश देणाऱ्या पसायदानाला नवी ओळख




■ परळी वैजनाथ : नितीन ढाकणे

भागवत धर्माचे रक्षक, थोर प्रबोधनकार, तत्वज्ञानी आणि युगप्रवर्तक राष्ट्रसंत श्री भगवानबाबांचा जन्मोत्सव ज्या श्रावण वद्य पंचमी या तिथीला साजरा केला जातो, तो दिवस शासनाच्या पातळीवर ‘पसायदान दिन’ म्हणून घोषित करण्यात यावा, अशी मागणी राज्यातील लाखो ज्ञानोपासक भाविक भक्तांकडून करण्यात येत असल्याची मागणी वंजारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश खाडे यांनी केली.

राष्ट्रसंत भगवानबाबांनी ज्ञानेश्वरी सर्वसामान्यांच्या हृदयात रुजवण्यासाठी आणि समाजामध्ये ज्ञान, भक्ती, कर्म व मानवतेचा संदेश पोहोचवण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. ‘बैसोनी पाण्यावरी वाचयली ज्ञानेश्वरी’ या त्यांच्या कार्याशी संबंधित परंपरेचा उल्लेख आजही भक्तिभावाने केला जातो. हा चमत्काराचा विषय नसून ज्ञानेश्वरीच्या सामर्थ्याचा आणि ज्ञानाच्या वैभवाचा साक्षात्कार घडवणारा प्रसंग म्हणून त्याकडे पाहिले जाते.

संतांचा जन्मोत्सव तिथीनुसार साजरा करण्याची परंपरा असल्याने श्रावण वद्य पंचमी ही भगवानबाबांच्या जन्मोत्सवाची तिथी असून, याच दिवशी घराघरात पसायदान म्हणण्याची परंपरा अधिक व्यापक व्हावी, अशी भाविकांची भावना आहे.

राष्ट्रसंत भगवानबाबांनी भागवत धर्माचा प्रचार-प्रसार, सामाजिक प्रबोधन, शिक्षणाचा प्रसार, अंधश्रद्धा निर्मूलन, सामाजिक समता आणि राष्ट्रभक्ती यासाठी मोठे कार्य केले. अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून त्यांनी मोठ्या संख्येने समाजाला एकत्र आणत ज्ञान, भक्ती आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला.

भगवानबाबांचे कार्य केवळ धार्मिक क्षेत्रापुरते मर्यादित नसून समाजप्रबोधन, शिक्षण, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक परिवर्तनाशी जोडलेले होते, असा भाविकांचा विश्वास आहे. ज्ञानेश्वरीतील पसायदान हे विश्वकल्याणाची प्रार्थना असून, त्याचा संदेश आजच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याची गरज असल्याचेही मागणी गणेश जी खाडे यांनी केले आहे. श्रावण वद्य पंचमी हा दिवस ‘पसायदान दिन’ म्हणून शासनाने घोषित करून राज्यभर साजरा करावा, तसेच या माध्यमातून राष्ट्रसंत भगवानबाबांच्या कार्याचा गौरव करावा, अशी एकमुखी मागणी लाखो भाविक भाविकांची असल्याचेही गणेश खाडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

# इंदपवाडी–डाबी रस्त्याच्या उपोषणाला उत्तम माने, ॲड . प्रकाश मुंडे व ॲड . ज्ञानेश्वर दहिफळे यांनी दिली भेट

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

इंदपवाडी ते डाबी या रस्त्याचे काम मागील दोन वर्षांपासून रखडले असून रस्ता अर्धवट अवस्थेत आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून खडी उखडल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करावे, या मागणीसाठी इंदपवाडी येथील ग्रामस्थांनी गेल्या चार दिवसांपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणास शेतकरी नेते उत्तम माने, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ॲड. प्रकाश मुंडे व ॲड. ज्ञानेश्वर दहिफळे यांनी सदिच्छा भेट देऊन ग्रामस्थांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला.

यावेळी उत्तम माने यांनी परळीचे उपजिल्हाधिकारी लाटकर व सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता मुंडे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून रस्त्याच्या रखडलेल्या कामाबाबत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली. गेल्या चार दिवसांपासून ग्रामस्थ उपोषणाला बसले असतानाही अद्याप ठोस तोडगा निघालेला नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

ॲड. प्रकाश मुंडे यांनी रस्ता एजन्सी व संबंधित अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून उपोषणकर्त्या ग्रामस्थांना न्याय देण्याची मागणी केली. तसेच कंत्राटदाराच्या दिरंगाईमुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले. ॲड. ज्ञानेश्वर दहिफळे यांनी रस्त्याच्या मागणीसाठी ग्रामस्थ व युवकांनी सुरू केलेले आंदोलन योग्य असल्याचे सांगून त्यांचे कौतुक केले. गावातील रस्ते तसेच इतर विकासकामांमध्ये काही गैरप्रकार होत असल्यास युवकांनी गप्प न बसता लोकशाही मार्गाने आवाज उठवावा, असे आवाहन त्यांनी केले.

इंदपवाडी आणि डाबी या दोन गावांना जोडणारा हा महत्त्वाचा रस्ता असून, या मार्गावरून शेतकरी, विद्यार्थी, नोकरदार व नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. रस्ता खराब असल्याने अपघातांचा धोका वाढला आहे. प्रशासनाने केवळ आश्वासने न देता रस्त्याचे काम तात्काळ सुरू करून पूर्ण करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. मागणी मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.




# व्हे पावडर प्रकरणाला मोठे वळण ; दिलीप हंबर्डे यांना अटक

■ आष्टी प्रतिनिधी

दुधामध्ये भेसळ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या Whey Powder (Skimmed) च्या अवैध वाहतूक व पुरवठ्याच्या प्रकरणाने आष्टी तालुक्यात खळबळ उडवून दिली असून, या प्रकरणाच्या तपासात आता आष्टी शहरातील दूध व्यवसायाशी संबंधित दिलीप जानदेव हंबर्डे यांना पोलिसांनी अटक केली आहे. ३१ ऑगस्ट रोजी अटक केल्यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या कारवाईची माहिती आष्टी पोलिसांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

आष्टी पोलिसांनी काही दिवसांपूर्वी दुधामध्ये भेसळ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या व्हे पावडरच्या अवैध वाहतूक व पुरवठ्याचा पर्दाफाश करत तब्बल ७२ गोण्या, म्हणजेच अंदाजे १ हजार ८०० किलो व्हे पावडर जप्त केली होती. या मुद्देमालाची अंदाजे किंमत २ लाख ६९ हजार ७०० रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली होती. या प्रकरणाचा तपास पुढे नेत असताना पोलिसांनी यापूर्वी सुशांत उर्फ बाबू लक्ष्मण गोपाळघरे, रा. नागोबाचीवाडी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर आणि कैलास जनार्दन हंबर्डे यांना अटक केली होती. त्यानंतर आता दिलीप जानदेव हंबर्डे यांना अटक करण्यात आल्याने या प्रकरणाला आणखी मोठे वळण मिळाले आहे.

दिलीप जानदेव हंबर्डे हे आष्टी शहरातील दूध व्यवसायाशी संबंधित असून, शहरात दूध व्यवसाय वाढविण्यासाठी पावडर प्लांट उभारत आहेत. दूध व्यवसायाशी संबंध असल्याने त्यांना दूध व्यावसायिक म्हणून त्यांची ओळख असल्याची चर्चा आहे. त्यांच्या अटकेची माहिती समोर आल्यानंतर आष्टी शहरासह तालुक्यात विविध चर्चांना उधाण आले आहे. विशेष म्हणजे, त्यांच्यावर यापूर्वी कोणतेही आरोप झाल्याची माहिती नसल्याने आणि शांत व स्वच्छ प्रतिमेचे व्यावसायिक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असल्याने या कारवाईने अनेकांना धक्का बसला आहे. मात्र, या प्रकरणातील आरोपांची सत्यता तपासातून आणि न्यायालयीन प्रक्रियेतूनच स्पष्ट होणार आहे. आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुधामध्ये भेसळ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या व्हे पावडरची अवैध वाहतूक व पुरवठा होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी कारवाई करत मोठ्या प्रमाणावर व्हे पावडर जप्त केली. याप्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३६९/२०२६ अन्वये अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेली व्हे पावडर नेमकी कुठून आणण्यात आली, तिचा पुरवठा कोणाला केला जाणार होता, तिचा प्रत्यक्ष वापर कशासाठी करण्यात येणार होता आणि या संपूर्ण व्यवहारामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

दुधामध्ये भेसळ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पदार्थांची अवैध खरेदी-विक्री किंवा पुरवठा हा केवळ आर्थिक गैरव्यवहाराचा विषय नसून तो थेट नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्न आहे.

# नैसर्गिक भाज्या व पारंपरिक आहार संस्कृतीचे संवर्धन ही आरोग्यवर्धक बाब : नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी

## परळीत रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन; ‘आरोग्यदायी रानभाज्यांची ओळख’ पुस्तकाचे प्रकाशन

■ परळी वैजनाथ : प्रतिनिधी....

माती, निसर्ग आणि पारंपरिक आहार संस्कृतीशी असलेले नाते अधिक दृढ करण्याची सध्याच्या काळात नितांत गरज निर्माण झाली आहे.पारंपरिक आहारसंस्कृतीचे संवर्धन ही आरोग्यवर्धक बाब असून याची अधिकाधिक व्याप्ती वाढली पाहिजे असे प्रतिपादन नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.परळीत रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले यावेळी त्या बोलत होत्या.

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) आणि तालुका कृषी अधिकारी, परळी वैजनाथ यांच्या वतीने आयोजित रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते झाले. उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर अध्यक्षस्थानी होते.महोत्सवाच्या निमित्ताने परळीच्या तालुका कृषी अधिकारी अर्चनाताई नागरगोजे यांच्या ‘आरोग्यदायी रानभाज्यांची ओळख’ या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकात तब्बल ७३ रानभाज्यांची माहिती देण्यात आली आहे. रानभाज्यांचे महत्त्व, त्यांची ओळख आणि त्यामागील पारंपरिक ज्ञान याची सखोल माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे.

यावेळी पुढे बोलताना नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले की,पावसाळ्यात परिसरात नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या रानभाज्या या पूर्वीच्या पिढ्यांच्या आहाराचा महत्त्वाचा भाग होत्या. या भाज्यांची ओळख, ऋतुमान, उपयोग तसेच पारंपरिक पद्धतीने त्यांची तयारी करण्याचे ज्ञान आजच्या बदलत्या जीवनशैलीत हळूहळू लोप पावत आहे. त्यामुळे अशा महोत्सवांच्या माध्यमातून हे पारंपरिक ज्ञान पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.




### स्थानिक संपत्तीला बाजारपेठेची जोड आवश्यक

■ रानभाज्यांकडे केवळ पारंपरिक अन्न म्हणून न पाहता त्यातील आर्थिक क्षमता ओळखण्याची गरज आहे. शास्त्रीय पद्धतीने संकलन व संवर्धन, लागवडीसाठी योग्य प्रजातींचा अभ्यास, मूल्यवर्धन, प्रक्रिया, पॅकेजिंग आणि बाजारपेठेशी जोडणी झाल्यास शेतकरी, महिला बचतगट तसेच ग्रामीण युवकांसाठी उत्पन्नाचे नवे मार्ग उपलब्ध होऊ शकतात. स्थानिक पातळीवर उपलब्ध नैसर्गिक संपत्तीचे ब्रँडिंग आणि प्रक्रिया उद्योग उभारल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते.

### अशा उपक्रमांना व्यापक स्वरूप हवे

■ आधुनिक विज्ञानाची जोड देत स्थानिक जैवविविधता आणि पारंपरिक आहारसंस्कृतीचे संवर्धन करणे आवश्यक आहे. रानभाजी महोत्सवासारख्या उपक्रमांमधून ग्रामीण संस्कृती, आरोग्य, पर्यावरण आणि अर्थव्यवस्था या सर्वच क्षेत्रांना चालना मिळू शकते. त्यामुळे ‘परंपरेपासून रोजगाराकडे आणि स्थानिक ज्ञानापासून शाश्वत विकासाकडे’ वाटचाल करण्यासाठी अशा उपक्रमांना व्यापक स्वरूप देण्याची अपेक्षा या महोत्सवातून व्यक्त करण्यात आली

# बी दि चेंज फाउंडेशनचा महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार 2026 संपादक आत्मलिंग शेटे यांना जाहीर

## पत्रकारिता, सामाजिक कार्य व जनसेवेतील उल्लेखनीय योगदानाची दखल; मान्यवरांच्या हस्ते होणार गौरव

■ परळी वैजनाथ, प्रतिनिधी

पत्रकारिता, सामाजिक कार्य आणि जनहिताच्या प्रश्नांसाठी गेली अनेक दशके सातत्याने कार्यरत असलेले ज्येष्ठ पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते आत्मलिंग प्रभुआप्पा शेटे यांची बी दि चेंज फाउंडेशनच्या 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६ – पर्व दुसरे' या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. शेटे यांच्या पत्रकारिता, सामाजिक बांधिलकी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी केलेल्या प्रदीर्घ संघर्षाची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते शाल व सन्मानपत्र प्रदान करून आत्मलिंग शेटे यांचा गौरव करण्यात येणार आहे. त्यांच्या या निवडीबद्दल परळी वैजनाथसह बीड जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### ३५ वर्षांहून अधिक काळ निर्भीड पत्रकारिता

आत्मलिंग प्रभुआप्पा शेटे हे गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय असून निर्भीड, परखड आणि सत्य लेखनासाठी त्यांची विशेष ओळख आहे. त्यांचे शासनमान्य यादीवरील साप्ताहिक 'परळी समाचार' हे वृत्तपत्र दि. २३ मे १९९३ पासून आजपर्यंत अखंडितपणे सुरू आहे. तसेच ते दैनिक 'धनजनरेखा' या वृत्तपत्राचेही संपादक आहेत.

अधिस्वीकृतीधारक पत्रकार म्हणून त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न, सामाजिक समस्या आणि जनहिताचे विषय सातत्याने प्रशासन व शासनापर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले आहे.

### रेल्वे प्रवाशांच्या प्रश्नांसाठी भरीव योगदान

शेटे यांनी DRUCC (Divisional Railway Users Consultative Committee) सदस्य म्हणून सलग तीन टर्म काम केले आहे. रेल्वे प्रवाशांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

रेल्वे प्रवाशांच्या सुविधेसाठी पादचारी पुलाची मागणी करून तो मंजूर व कार्यान्वित करण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. परळी रेल्वे स्थानकाचे व शहराचे महत्त्व अधोरेखित करणारे विविध माहिती फलक उभारण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

तसेच अपंग व अंध व्यक्तींना रेल्वे प्रवासासाठी आवश्यक पास मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करून त्यांना न्याय मिळवून दिला. विविध रेल्वे स्थानकांवरील प्रवाशांच्या अनेक समस्या आणि मागण्यांचा पाठपुरावा करून त्या मार्गी लावण्यासाठी त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.

### सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय सहभाग

पत्रकारितेबरोबरच आत्मलिंग शेटे यांनी विविध सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे. वीरशैव समाजाचा ओबीसी संवर्गात समावेश व्हावा यासाठी झालेल्या आंदोलनात त्यांनी सक्रिय भूमिका बजावली. दि. १८ ऑगस्ट २०१२ रोजी अण्णा हजारे यांच्या जनलोकपाल विधेयक आंदोलनाला पाठिंबा देत मुकमोर्चा आणि सद्भावना रॅलीमध्ये त्यांनी हिरिरीने सहभाग घेतला. परळीतील युवकांचे संघटन करून त्यांनी 'मानवता कल्याण' संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक व विकासात्मक प्रश्नांसाठी कार्य करण्यात आले. सर्व समाजघटकांना सोबत घेऊन सामाजिक कार्याची व्यापक चळवळ उभी करण्यात त्यांचे योगदान राहिले आहे.



### लिंगायत समाजाच्या प्रश्नांसाठी सातत्यपूर्ण कार्य

लिंगायत संघर्ष समितीच्या माध्यमातून वीरशैव-लिंगायत समाजाच्या विविध प्रश्नांसाठी त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. वीरशैव समाजासाठी मोक्षधाम योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न, वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनासाठी उपक्रम तसेच लिंगायत समाजाला धर्म मान्यता मिळावी, पोटजातींना आरक्षण व अल्पसंख्याक दर्जा मिळावा यासाठी आयोजित विविध शिबिरे, मेळावे, मोर्चे आणि आंदोलनांमध्ये त्यांनी सक्रिय योगदान दिले आहे.

### कोरोना काळात जनजागृतीचे कार्य

कोरोना महामारीच्या अत्यंत कठीण काळात लॉकडाऊनदरम्यान नागरिकांनी कोरोनाचा मुकाबला कसा करावा, शासनाच्या नियमांचे आणि आचारसंहितेचे पालन कसे करावे, याबाबत आत्मलिंग शेटे यांनी विविध माध्यमांतून व्यापक जनजागृती केली. प्रत्यक्ष नागरिकांशी संवाद साधत तसेच वृत्तपत्राच्या माध्यमातून कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांबाबत सातत्याने प्रबोधन करण्यात आले. या सामाजिक कार्याची दखल घेऊन नाशिक व जालना येथील सामाजिक संस्थांनी त्यांचा 'कोरोना योद्धा' म्हणून सत्कार करून मानपत्र प्रदान केले आहे.

### विविध पुरस्कारांनी यापूर्वीही गौरव

पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल आत्मलिंग शेटे यांना यापूर्वी विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

- **समाजभूषण पुरस्कार – २८ डिसेंबर २०१४, लातूर येथील लिंगायत महामेळाव्यात**
- **बहुजन रत्न पुरस्कार – सन २०१६, बसवेश्वर समता परिषद, नांदेड**
- **उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार – ११ मार्च २०१८, उन्नती महिला प्रतिष्ठान, भोर, जि. पुणे**
- **बसवरत्न पुरस्कार – १८ एप्रिल २०१८, बसव प्रतिष्ठान, मुरूम**
- **कोरोना योद्धा सन्मान – कोरोना काळातील जनजागृती व सामाजिक कार्याबद्दल**

### पत्रकारितेला समाजपरिवर्तनाचे माध्यम मानणारे व्यक्तिमत्त्व

पत्रकारिता हे केवळ व्यवसायाचे माध्यम नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, या विचाराने आत्मलिंग शेटे यांनी आपली पत्रकारितेची आणि सामाजिक कार्याची वाटचाल सुरू ठेवली आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे, सर्वसामान्यांच्या समस्या शासन व प्रशासनापर्यंत पोहोचविणे, वंचित व दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, हे त्यांच्या कार्याचे प्रमुख उद्दिष्ट राहिले आहे.

अपंग, परित्यक्ता, विधवा व निराधार महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करणे तसेच समाजातील दुर्लक्षित घटकांच्या प्रश्नांना वाचा फोडणे, यासाठीही त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

**परळीच्या पत्रकारितेचा गौरव**

■ परखड लेखणी, सामाजिक बांधिलकी, जनहिताच्या प्रश्नांवरील ठाम भूमिका आणि सर्वसामान्यांसाठी सातत्याने सुरू असलेला संघर्ष, यामुळे आत्मलिंग प्रभुआप्पा शेटे यांची बी दि चेंज फाउंडेशनच्या महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६ साठी झालेली निवड ही परळी वैजनाथ आणि बीड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

**हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा!**

■ आत्मलिंग प्रभुआप्पा शेटे संपादक – साप्ताहिक परळी समाचार संपादक – दैनिक धनजनरेखा, परळी वैजनाथ
■ अधिस्वीकृतीधारक पत्रकार माजी सदस्य – DRUCC, रेल्वे बोर्ड (तीन टर्म) मोबाईल : ९८२२४००७४१



# परळी तालुका माहेश्वरी युवा संघटनेच्या अध्यक्षपदी ॲड. संज्योत लाहोटी

## नवीन कार्यकारिणी बिनविरोध; युवा शक्तीला संघटित करून सामाजिक, शैक्षणिक व कौशल्य विकासाला प्राधान्य

■ परळी वैजनाथ प्रतिनिधी

परळी तालुका माहेश्वरी युवा संघटनेची बैठक नुकतीच उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या बैठकीत समाजातील ४० वर्षांखालील युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत युवा एकता, संघटनशक्ती आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. यावेळी सन २०२६ ते २०२९ या तीन वर्षांच्या कार्यकाळासाठी नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली.

निवर्तमान अध्यक्ष सूरज रतनजी कोठारी तसेच माजी बीड जिल्हा पीआरओ सुमित भगवानदासजी लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली निवड प्रक्रिया पार पडली. उपस्थित युवा सदस्यांच्या सर्वानुमते अध्यक्षपदी ॲड. संज्योत जयपालजी लाहोटी, सचिवपदी कपिल नंदकिशोरजी मुंदडा, तर कोषाध्यक्षपदी गोविंद श्रीरामजी पोरवाल यांची निवड करण्यात आली.

नवीन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे :उपाध्यक्ष : सुमित मुरलीधरजी नावंदर, गणेश राजेंद्रप्रसादजी सोनी, लक्ष्मीकांत गोविंदलालजी पल्लोड, श्रीनिवास भगवानदासजी लाहोटी. संघटन मंत्री : आकाश संतोषजी कलंत्रीनियोजन मंत्री : श्रीकांत घनश्यामजी तोतला सहसचिव : निलेश अनिलजी लाहोटी, सौरव जयप्रकाशजी लड्ढा सहकोषाध्यक्ष : दर्शन शामसुंदरजी मंत्री सांस्कृतिक मंत्री :अमित जुगलकिशोरजी रांदड आरोग्य मंत्री : डॉ. दर्शन रमेशचंद्रजी काबरा क्रीडा मंत्री : ॲड. राम चंद्रकांतजी जाजू व्यवसाय प्रकोष्ठ मंत्री : शैलेश श्रीनिवासजी तापडिया शैक्षणिक व कौशल्य विकास मंत्री : सीए मोनेश कैलासचंदजी भूतडा बधाई संदेश मंत्री : अक्षय राजेंद्रजी रांदड प्रसिद्धी प्रमुख : रमन जगदीशजी नावंदर सोशल मीडिया प्रमुख : सुशांत सूर्यकांतजी सोनी कार्यालयीन मंत्री : अमन धीरजजी भराडिया. नवीन कार्यकारिणीची स्थापना ही केवळ पदाधिकाऱ्यांची निवड नसून, परळी तालुका माहेश्वरी समाजातील युवा शक्तीच्या नव्या पर्वाची सुरुवात असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. समाजातील जास्तीत जास्त युवकांना संघटनेशी जोडून त्यांच्यातील ऊर्जा विधायक कार्यासाठी वापरण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. संज्योत जयपालजी लाहोटी यांनी, "जास्तीत जास्त युवकांना संघटनेशी जोडून युवा शक्तीची नवी ताकद उभी करणार असून, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, आरोग्य तसेच कौशल्य विकासाच्या क्षेत्रात प्रभावीपणे कार्य करू," असा विश्वास व्यक्त केला.

आगामी तीन वर्षांच्या कार्यकाळात युवकांना एकत्रित करून समाजहिताचे विविध उपक्रम राबविण्याबरोबरच युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार नवीन कार्यकारिणीने व्यक्त केला. नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. संज्योत लाहोटी यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्यांचे समाजातील विविध स्तरांतून अभिनंदन होत असून, त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# उपचारासाठी गेलेल्या १९ वर्षीय तरुणीचा डॉक्टरवर गैरवर्तनाचा आरोप; आष्टी पोलिसांत गुन्हा दाखल

## पटवा हॉस्पिटलमधील घटना; पोलिसांचा तपास सुरू

■ आष्टी प्रतिनिधी

कडा येथील पटवा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी गेलेल्या १९ वर्षीय तरुणीने डॉक्टरने तिच्यासोबत गैरवर्तन केल्याचा गंभीर आरोप केला आहे. या प्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात डॉक्टर महेंद्र पटवा यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) मधील कलम ७४, ७५(१) आणि ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे कडा परिसरात खळबळ उडाली असून, या प्रकरणाचा पुढील तपास आष्टी पोलिसांकडून सुरू आहे.

पोलिसांत दाखल झालेल्या फिर्यादीनुसार, संबंधित तरुणी कडा येथील हांडे वस्ती परिसरातील रहिवासी असून तिचे वय १९ वर्षे आहे. ती व्यावसायिक शिक्षण घेत असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. २९ ऑगस्ट २०२६ रोजी श्वास घेण्यास त्रास होत असल्याने ती आई-वडिलांसोबत पटवा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी गेली होती. त्यावेळी तिला सलाईन, इंजेक्शन आदी उपचार करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. त्यानंतर ३० ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास पुन्हा त्रास सुरू झाल्याने ती आई-वडिलांसोबत पटवा हॉस्पिटलमध्ये गेली. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर तिला सलाईन लावण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. उपचार सुरू असताना डॉक्टरांनी संबंधित तरुणीला काही कारण सांगून केबिनमध्ये बोलावले. त्यानंतर तिच्या आईला बाहेर जाण्यास सांगून केबिनचा दरवाजा बंद केला. यावेळी डॉक्टरांनी तिच्याशी अश्लील स्वरूपाचे बोलणे करून तिच्या इच्छेविरुद्ध शरीराला स्पर्श केल्याचा आरोप तरुणीने फिर्यादीत केला आहे. तरुणीने विरोध केला असता, बाहेर कोणाला काही सांगू नकोस, अन्यथा तुझी बदनामी होईल, अशा स्वरूपाची धमकी दिल्याचाही आरोप तिने केला आहे. या प्रकारामुळे घाबरलेल्या तरुणीने तेथून बाहेर आल्यानंतर घरी जाऊन आई-वडिलांना घडलेला प्रकार सांगितल्याचे पोलिसांना दिलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घडलेल्या कथित प्रकारानंतर ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास तरुणीने आष्टी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तिच्या तक्रारीवरून पोलिसांनी FIR क्रमांक ०३८७/२०२६ नोंदविला आहे. या प्रकरणात डॉक्टर महेंद्र पटवा, पटवा हॉस्पिटल, कडा यांचे नाव आरोपी म्हणून नमूद करण्यात आले आहे. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ७४, ७५(१) व ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल केला असून, तक्रारीतील आरोपांची चौकशी व पुढील तपास आष्टी पोलिसांकडून सुरू आहे.

# जयश्रीताई नरवाडे यांची महिला काँग्रेस कमिटीच्या तालुका अध्यक्षपदी निवड



■ महागाव प्रतिनिधी

महागावच्या नगरसेविका , सौ. जयश्रीताई संजय नरवाडे यांची महिला काँग्रेस कमिटीच्या तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांच्यावर सर्वत्र कडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांनी समाजासाठी वंचितांच्या न्याय हक्कासाठी लाभार्थ्यांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी जो लढा दिला जी आंदोलने केली व त्या आंदोलनांना यशही मिळाल्याचे निदर्शनास आले असून जयश्री ताईंचे जनसामान्यांचे प्रश्न निकाली काढण्याचे ध्येय व चिकाटी पाहता जयश्रीताई यांना महिला काँग्रेस कमिटीच्या तालुका अध्यक्षपदी निवड महिला काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्ष सौ. वंदना पुरुषोत्तम आचारी यांनी निवड केली असून जयश्री ताईंना पक्ष बळकटी व जयश्रीताईंच्या नेतृत्वातून महिला सक्षमीकरणाला नवी दिशा मिळो आणि काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद अधिक बळकट होवो.

# नाशिक–त्र्यंबकेश्वरचा कायापालट होणार ! सिंहस्थ कुंभमेळ्यावर तब्बल ३५ हजार कोटींचा खर्च

■ नाशिक वृत्तसंस्था

: हिंदू धर्मीयांच्या आस्थेशी जोडलेल्या कुंभमेळ्याने गतवर्षी प्रयागराजमध्ये गर्दीचे नवे विक्रम प्रस्थापित केले. आता २०२७ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणारा सिंहस्थ कुंभमेळा खर्चाच्या बाबतीत नवा विक्रम नोंदवणार आहे. मागील १२ वर्षांत देशात झालेल्या सहा कुंभमेळ्यांवर झालेल्या एकूण खर्चाच्या तुलनेत यंदाचा खर्च कित्येक पटीने अधिक असणार आहे. तब्बल ३५ हजार कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधांनी नाशिक-त्र्यंबकेश्वरचा सिंहस्थ कुंभमेळा सजणार आहे. या निधीपैकी सर्वाधिक ५१ टक्के निधी रस्ते बांधणी आणि रस्ते विकासासाठी खर्च केला जाणार आहे. तर इमारती आणि संस्थात्मक पायाभूत सुविधांसाठी नऊ टक्के, पूल आणि उड्डाणपुलांसाठी आठ टक्के निधी खर्च होणार आहे.

### कुंभमेळ्यात तब्बल १२ कोटी भाविक ?

२०२५ मध्ये प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभात गर्दीचे आजवरचे अनेक विक्रम मोडीत निघाले. अपेक्षेपेक्षा तब्बल पाचपट भाविक या कुंभमेळ्यात सहभागी झाले होते. आता २०२७ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे पुढील कुंभमेळा होत असून, या सिंहस्थ कुंभमेळ्यात तब्बल १२ कोटी भाविक सहभागी होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या संभाव्य गर्दीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणावर नियोजन आणि जय्यत तयारी सुरू आहे. राज्य आणि केंद्र सरकार तसेच नाशिक महापालिकेकडून तब्बल ३५ हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. धार्मिक परंपरा, आधुनिक तंत्रज्ञान आणि दीर्घकालीन पायाभूत सुविधांचा समन्वय साधत नाशिक-त्र्यंबकेश्वरला देशाची प्रमुख आध्यात्मिक राजधानी म्हणून विकसित करण्याची तयारी कुंभमेळा प्राधिकरणाने केली आहे. कुंभमेळ्यात साधू-महंतांसह भाविकांची संख्या कोट्यवधींच्या घरात पोहोचते. त्यामुळे भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतंत्र आर्थिक नियोजन करावे लागते. याच पार्श्वभूमीवर देशातील कुंभमेळ्यांच्या खर्चाची आकडेवारी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ चा आराखडा तयार करताना प्रशासनाने मांडली होती. त्यानुसार, २०१३ ते २०२५ या कालावधीत देशात सहा कुंभमेळे झाले. २०१३ मधील प्रयागराज कुंभमेळ्यासाठी शासनाने १ हजार १४२ कोटी रुपये, नाशिक-त्र्यंबकेश्वरमधील २०१५ च्या कुंभमेळ्यासाठी २ हजार ३७९ कोटी रुपये, उज्जैनमधील २०१६ च्या कुंभमेळ्यासाठी २ हजार ८१० कोटी रुपये, तर प्रयागराजमधील २०१९ च्या अर्धकुंभासाठी ३ हजार ६०० कोटी रुपयांहून अधिक निधी खर्च करण्यात आला. यानंतर हरिद्वारमधील २०२१ च्या कुंभमेळ्यासाठी १ हजार ५० कोटी रुपये, तर प्रयागराजमधील २०२५ च्या महाकुंभासाठी ७ हजार ३०३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र, आता नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी यापेक्षा कित्येक पटीने मोठा खर्च होणार आहे.

### कुंभमेळ्यावर तब्बल ३५ हजार कोटींचा खर्च

पुढील वर्षी नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी राज्य शासनाच्या अखत्यारीतील प्राधिकरणाने २२ हजार ४२५ कोटी ३९ लाख रुपयांच्या योजनांना मान्यता दिली आहे. याशिवाय सार्वजनिक बांधकाम विभागाकडून २ हजार २७० कोटी ६० लाख रुपये, त्र्यंबकेश्वर तीर्थक्षेत्र विकासासाठी एमएसआयडीसीकडून २७५ कोटी रुपये, महापारेषणकडून ९४६ कोटी ८१ लाख रुपये, तर नाशिक जिल्हा परिषदेच्या ३५ कोटी ८ लाख रुपयांच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. केंद्र सरकारकडूनही ८ हजार ७६१ कोटी ५४ लाख रुपयांची कामे केली जात आहेत.

यामध्ये राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची २ हजार ७६३ कोटी २४ लाख रुपयांची कामे, राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाची ४ हजार ३५५ कोटी ९२ लाख रुपयांची कामे, रेल्वेची १ हजार ३२९ कोटी २४ लाख रुपयांची कामे, रामकाल पथासाठी महापालिकेचे ९९ कोटी १४ लाख रुपये, तर एमएसआयडीसीच्या द्वारका चौकातील कामासाठी २१४ कोटी रुपयांचा समावेश आहे. अशाप्रकारे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आराखड्यात आतापर्यंत तब्बल ३४ हजार ७३२ कोटी ४२ लाख रुपयांच्या कामांचा समावेश करण्यात आला आहे. आता या एकूण निधीपैकी कोणत्या सुविधांवर किती खर्च होणार, हे पाहणंही महत्त्वाचं आहे.

### स्त्यांसाठीच ५१ टक्के निधी

कुंभमेळ्यासाठी खर्च होणाऱ्या एकूण निधीपैकी तब्बल ५१ टक्के रक्कम केवळ रस्ते विकासासाठी वापरली जाणार आहे. देशभरातून येणाऱ्या साधू-महंतांच्या निवासासाठी उभारण्यात येणाऱ्या साधुग्रामसह तात्पुरत्या स्वरूपातील पायाभूत सुविधांसाठी १७ टक्के निधी खर्च केला जाणार आहे. इमारती आणि संस्थात्मक पायाभूत सुविधांसाठी नऊ टक्के, पूल आणि उड्डाणपुलांसाठी आठ टक्के, भाविकांसाठी वाहनतळ आणि वाहतूक व्यवस्थेसाठी सहा टक्के, विद्युत पायाभूत सुविधांसाठी तीन टक्के, पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापनासाठी दोन टक्के, नवीन घाट बांधणी आणि नदीकाठावरील कामांसाठी दोन टक्के, तर सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस आणि अग्निशमन दलाच्या व्यवस्थेसाठी एक टक्का निधी खर्च होणार आहे.

### पायाभूत सुविधांपैकी ८५ टक्के कामे कायमस्वरूपी

विशेष म्हणजे, कुंभमेळ्यासाठी उभारण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधांपैकी तब्बल ८५ टक्के कामे कायमस्वरूपी स्वरूपाची असणार आहेत. तर उर्वरित १५ ते १६ टक्के कामे केवळ कुंभमेळ्याच्या कालावधीपुरती तात्पुरत्या स्वरूपाची असतील.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, मंगळवार, 1 सप्टेंबर 2026






# पर्यावरण संवर्धनासाठी 'थोडे थांबा, विचार करा आणि संवेदनशील बना' : पुण्यातून आवाहन



**पुणे | प्रतिनिधी**

भामला फाउंडेशन आणि पंचशील फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नाला सुशोभीकरण मोहीम' तसेच 'ग्रीन क्रुसेडर्स अँड अचिव्हर्स पुरस्कार' वितरण सोहळ्याला पुण्यात उत्साहात सुरुवात झाली. या कार्यक्रमाला पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी पर्यावरण संवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा 'ग्रीन क्रुसेडर्स अँड अचिव्हर्स' पुरस्काराने गौरव करण्यात आला. यामध्ये पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महेंद्र कल्याणकर, अभिनेते जॅकी श्रॉफ, पूनावाला समूहाचे प्रतिनिधी तसेच गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि गोदरेज ॲग्रोव्हेटचे अध्यक्ष नादिर गोदरेज यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा समावेश होता. कार्यक्रमात पर्यावरण आणि हवामान बदलाच्या वाढत्या संकटावर चिंता व्यक्त करण्यात आली. निसर्गाचा अमर्याद वापर आणि पर्यावरणाचा होणारा ऱ्हास यामुळे नैसर्गिक आपत्तींचे संकट वाढत आहे.

त्यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी शासनासोबतच प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखून योगदान देणे गरजेचे असल्याचे सांगण्यात आले. "पर्यावरणासाठी थोडे थांबा, विचार करा आणि संवेदनशील बना. छोटे-छोटे बदलच भविष्यात मोठ्या परिवर्तनाची सुरुवात ठरतात," असे आवाहन यावेळी करण्यात आले. या सोहळ्यास राज्यपाल जिष्णू देव वर्मा, सभापती राम शिंदे, नादिर गोदरेज, भामला फाउंडेशनचे संस्थापक आसिफ भामला, पंचशील ग्रुपचे संस्थापक व अध्यक्ष अतुल चोरडिया, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि पुरस्कारार्थी उपस्थित होते.



# नामस्मरणानेच जीवनाचे कल्याण; भगवंताच्या नामात पाप नष्ट करण्याची शक्ती : ह.भ.प. निळकंठ महाराज तावरे

**आष्टी प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील कासेवाडी येथे श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारचे औचित्य साधून काशी विश्वेश्वर देवस्थान व काशीगिरी बाबा यांच्या संजीवन समाधीस्थळी धार्मिक महोत्सव उत्साहात पार पडला. यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात हरिभक्ती परायण निळकंठ महाराज तावरे यांचे हरिकीर्तन झाले. कीर्तनानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक सोहळ्यास पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तिमय वातावरण निर्माण केले.

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या अभंगाचे निरूपण करताना ह.भ.प. निळकंठ महाराज तावरे यांनी भगवंताच्या नामस्मरणाचे महत्त्व विशद केले. "सदा नामघोष करू, हरिकथा तेणे सदा चित्ता समाधान" या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून भगवंताचे नामस्मरण करण्याचा संदेश दिला आहे. कलियुगामध्ये भवसागरातून पार होण्यासाठी भगवंताचे नाम हेच प्रभावी साधन असून, नामस्मरणामुळे मनाला समाधान व जीवनाला योग्य दिशा मिळते,मानवी जीवनाचे अंतिम ध्येय केवळ संसार, संपत्ती, ऐश्वर्य किंवा भौतिक सुख नसून भगवंताची प्राप्ती आणि मोक्ष हेच आहे, असे महाराजांनी सांगितले. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ सांगितले असले तरी मोक्ष हा परम पुरुषार्थ आहे. मनुष्याने कितीही संपत्ती, सौंदर्य किंवा ऐश्वर्य मिळवले तरी त्याला जीवनाच्या अंतिम सत्याचा विसर पडता कामा नये. शरीर हे भगवंताने परमार्थासाठी दिले असून, त्याचा उपयोग नामस्मरण, भक्ती आणि परोपकारासाठी झाला पाहिजे, शरीराचे महत्त्व स्पष्ट करताना त्यांनी मानवी शरीराची तुलना महागड्या वाहनाशी केली. आपण लाखो रुपयांची गाडी घेतल्यानंतर तिची वेळोवेळी सर्व्हिसिंग करतो, योग्य ऑईल टाकतो आणि तिची काळजी घेतो. त्याचप्रमाणे देवाने दिलेल्या या अमूल्य शरीराची आणि जीवनाचीही योग्य काळजी घेऊन त्याचा उपयोग चांगल्या कार्यासाठी केला पाहिजे. शरीर, डोळे, कान, नाक, हात-पाय यांसारखी अमूल्य इंद्रिये भगवंताने दिली आहेत. त्यामुळे या देहाचा उपयोग केवळ भौतिक सुखासाठी न करता भगवंताच्या प्राप्तीसाठी केला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

आपले जीवन पाण्याच्या बुडबुड्यासारखे क्षणभंगुर आहे. कोणाचा जीवनप्रवास कधी संपेल, हे सांगता येत नाही. त्यामुळे जीवनातील प्रत्येक क्षणाचा सदुपयोग करून नामस्मरण, परमार्थ आणि परोपकार केला पाहिजे. आपल्या उत्पन्नातील किंवा सामर्थ्यातील थोडासा भाग जरी समाजसेवेसाठी खर्च केला, तरी त्यातून मिळणारे समाधान मोठे असते. गरजू व्यक्तीला केलेली छोटीशी मदतही त्याच्या आयुष्यभर स्मरणात राहते, असे सांगत त्यांनी परोपकाराचे महत्त्व पटवून दिले. या धार्मिक महोत्सवाला देविदास धस, जयदत्त धस, माजी उपसभापती आजिनाथ सानप, सतीश शिंदे, पांढरीचे सरपंच सुधीर पठाडे, ब्रह्मगावचे सरपंच रोहिदास पवार यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सर्व नियोजन जय भगवान मित्र मंडळ, कासेवाडी यांच्या वतीने करण्यात आले. महाप्रसादानंतर धार्मिक महोत्सवाची सांगता झाली.



# राष्ट्रसंत श्री भगवानबाबांचा जन्मोत्सव 'पसायदान दिन' म्हणून घोषित करावा! : डॉ. सुवर्णा कराड



**संतांचा जन्मोत्सव त्यांच्या जन्मतिथीनुसार साजरा करण्याची परंपरा आहे. संत भगवानबाबांची जन्मतिथी श्रावण वद्य पंचमी असल्याने हा दिवस 'पसायदान दिन' म्हणून शासनाने घोषित करावा, अशी राज्यातील लाखो ज्ञानोपासक, भाविक आणि भक्तांची मागणी आहे. विश्वकल्याणाची कामना करणारे पसायदान संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ज्ञानेश्वरीचे अंतिम सार आहे. ही विश्वकल्याणाची भावना सर्वसामान्यांच्या जीवनात रुजविण्याचे मोठे कार्य संत भगवानबाबांनी केले. त्यामुळे त्यांच्या जन्मतिथीला पसायदान दिनाचे स्वरूप देणे हे त्यांच्या ज्ञानप्रसाराच्या कार्याला साजेसे ठरेल.**

संत भगवानबाबा हे भागवत धर्माचे प्रचारक आणि प्रसारक, थोर प्रबोधनकार, समाजसुधारक, राष्ट्रभक्त, विद्वान आणि महान तपस्वी होते. ज्ञानेश्वरी सर्वसामान्यांच्या हृदयात रुजावी यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. 'बैसोनी पाण्यावरी वाचयली ज्ञानेश्वरी' हा त्यांच्या ज्ञानसाधनेशी संबंधित प्रसंग त्यांच्या अनुयायांच्या श्रद्धेचा विषय आहे. त्यामागील महत्त्व चमत्कारापेक्षा ज्ञानेश्वरीच्या सामर्थ्याचा साक्षात्कार घडविण्यात आहे.

ज्ञान माणसाला केवळ शिक्षित करत नाही, तर त्याच्यामध्ये विवेक आणि मनुष्यत्व निर्माण करते. हाच विचार भगवानबाबांनी समाजापर्यंत पोहोचविला. त्यांच्या कार्यामुळे ज्ञानेश्वरी, हरिनाम आणि भागवत विचार घराघरात पोहोचले.

अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून त्यांनी मोठ्या संख्येने लोकांना एका आध्यात्मिक आणि सामाजिक विचाराभोवती एकत्र आणले. इंग्रजांच्या राजवटीत समाजजागृतीचे हे कार्य अत्यंत महत्त्वाचे होते. ज्ञान, भक्ती आणि कर्म यांचा समन्वय साधत त्यांनी समाजाच्या मानसिक आणि वैचारिक उन्नतीसाठी काम केले.

त्यांचे योगदान अध्यात्मापुरते मर्यादित नव्हते. सामाजिक समता, शिक्षणाचा प्रसार, अंधश्रद्धा निर्मूलन, गोहत्याबंदी, राष्ट्रभक्ती आणि समाजजागृती या क्षेत्रांतही त्यांनी कार्य केले. स्वातंत्र्य चळवळ आणि मराठवाडा मुक्ती संग्रामाशी संबंधित त्यांच्या योगदानालाही त्यांच्या अनुयायांकडून विशेष महत्त्व दिले जाते. भगवानबाबांनी ज्ञानाची गंगा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम केले. म्हणूनच त्यांना आधुनिक भगीरथ मानले जाते. गडधर्मपीठाची निर्मिती, हरिनाम सप्ताहाची व्यापक चळवळ आणि ज्ञानेश्वरीचा प्रसार या माध्यमातून त्यांनी समाजाला आध्यात्मिक आणि वैचारिक आधार दिला.

आजच्या काळातही पसायदानाचा संदेश तितकाच महत्त्वाचा आहे. समाजात द्वेषाऐवजी प्रेम, अज्ञानाऐवजी ज्ञान, असमानतेऐवजी समता आणि स्वार्थाऐवजी विश्वकल्याणाची भावना निर्माण करण्याची गरज आहे. त्यामुळे पसायदान केवळ धार्मिक परंपरेपुरते न राहता सामाजिक आणि मानवी मूल्यांची जाणीव करून देणारे माध्यम बनले पाहिजे.

यासाठी श्रावण वद्य पंचमी हा 'पसायदान दिन' म्हणून शासनाने घोषित करावा. या दिवशी राज्यातील शाळा, महाविद्यालये, शासकीय संस्था आणि सार्वजनिक ठिकाणी पसायदानाचे सामूहिक पठण, त्याचा अर्थ समजावून सांगणारे उपक्रम आणि संत भगवानबाबांच्या विचारांचा प्रसार करण्यात यावा. भगवानबाबांच्या जन्मतिथीला अशा प्रकारे व्यापक सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूप दिल्यास त्यांच्या कार्याचा सन्मान होईल आणि पसायदानामधील विश्वकल्याणाची भावना पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचेल. श्रावण वद्य पंचमी ही संत भगवानबाबांच्या जन्मोत्सवाबरोबरच विश्वकल्याणाची भावना जागविणारा 'पसायदान दिन' म्हणून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात स्थान मिळवावी, हीच अपेक्षा.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)